**दिनांक 20.07.2023 मा. विभागीय आयुक्त, कोकण यांचे अध्यक्षतेखाली कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या 41 व्या बैठकीची विषयसूची. (वेळ 04.00 वाजता)**

| अ.क्र | विषय |
|---|---|
| 1 | महानगरपालिके अंतर्गत पाणथळ तक्रार निवारण  समिती  गठीत करणेबाबत व समितीच्या दरमहा बैठका घेणेबाबत. |
| 2 | नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत चर्चा |
| 3 | पाणथळ तक्रार निवारण समितीसाठी टोल फ्री क्रमांक सुरु करणेबाबत चर्चा. |
| 4 | डेब्रिस  हटवून इतरत्र निश्चित ठिकाणी टाकण्याबाबत चर्चा. |
| 5 | पाणथळ तक्रार निवारण समितीच्या कार्याबाबत चर्चा. |

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त तक्रारींवरील कार्यवाहीचा तपशील

| अ. क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारी यंत्रणा | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | **मुंबई उपनगर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | | |
| 1 | **श्री. स्टॅलीन डी. (WC- 73)**<br>Destruction of wetlands & near Bhakti Park Mono Rail station & nearby areas in Wadala.<br>दि. 31.01.2019 | • उपनमक आयुक्त कार्यालय, बेलार्ड ईस्टेट, मुंबई यांच्या दि.14.10.2022 रोजीच्या अहवालानूसार वडाळा सॉल्ट पॅन विभागातील, सॉल्ट पॅन जमीन ही भारत शासनाच्या अखत्यारीत आहे. सदर अहवालानूसार डेब्रिज हटवण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून (MCGM) करण्यात यावी. त्यासंदर्भात त्यांच्याशी अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला आहे, परंतु अद्यापही त्यांच्यामार्फत तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.<br>• मीठ उपअधीक्षक, वडाळा यांचे मार्फत वडाळा पोलीस स्टेशनमध्ये FIR No. 265/2020 व No. 358/2021 अन्वये गुन्हा दाखल करण्यात येऊन, पोलीसांद्वारे पुढील कार्यवाहीच्या प्रतिक्षेत आहे. तसेच कांदळवन कक्षाद्वारे गुन्हेगारांविरुध्द FIR दाखल करण्यात यावी असे सूचित केले आहे. मात्र, अशा बेकायदेशीर कामांवर कारवाई करण्यासाठी मिठागरे विभागामार्फत आवश्यक ती पावले उचलत आहोत. जून 2022 मध्ये, MCGM आणि वन विभागाच्या मदतीने (कांदळवन कक्ष) वडाळा येथे जमीनदोस्त करण्याची मोहीम राबविण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.<br>• तदनुसार मा.अध्यक्षांनी सदर क्षेत्रात झालेली भरणी काढून टाकून जागा पुर्ववत करण्याचे निर्देश संबंधीत यंत्रणेला दिले. | 1. उपनमक आयुक्त कार्यालय, मुंबई<br>2. बृहन्मुंबई महानगरपालिका | अहवाल अप्राप्त |
| 2 | **श्री.स्टॅलिन डी. (WC-109)**<br>Request for restoration of Culvem lake Gorai and also action against destroyers of wetlands.<br>दि. 15.04.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी | अहवाल अप्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | **श्री. हरिष पांडे**<br>**(WC-110)**<br>Destruction of wetland & creek in Gorai Essel world area.<br>दि. 17.04.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी | अहवाल अप्राप्त |

| **ठाणे जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | | | | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| 4 | **श्री. स्टॅलिन डी**<br>(**WC**- 81)<br>Reclamation of Wetlands on the<br>Left side of Kharigaon Toll Plaza as one drives from Thane to Kalyan.<br>दि. 20.01.2020 | • ठाणे महानगरपालिका यांचे दि.21.07.2022 रोजीच्या अहवालानूसार सदर जागा वनविभागाच्या अधिपत्याखाली असून, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या विभागातर्फे कोणतेही फलक अथवा सिक्युरिटी गार्ड तेथे उपलब्ध नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात तेथे भरणी होते. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भरणी काढण्याबाबत महानगरपालिकेला आदेश दिले जातात. भरणी काढण्यासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याने महापालिका स्तरावर त्याबाबत जास्त कालावधी लागत असल्याचे नमुद केले आहे.<br>• तक्रारदाराने नमुद केल्यानुसार मा. विभागीय आयुक्त यांनी कांदळवन संवर्धनासाठी अजून पुढील एक नैसर्गिक प्रवाह खुला करुन द्यावा, याप्रमाणे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना ठामपा/प्रनिक/209/2022-23 दि.17.06.2022 रोजीच्या पत्रान्वये परवानगी मिळण्याबाबत कळविण्यात आले होते.<br>• तथापि ठाणे महानगरपालिका यांचे दि.05.07.2023 रोजीच्या अहवलानूसार वन विभागाच्या दि.28.09.2021 रोजीच्या परवानगीने 10 मी खोल व 30 मी लांब ट्रेन्च खोदून दिला असून त्याबाबतचा अहवाल कोकण विभागीय आयुक्त यांना दि.21.01.2022 रोजी कळविले आहे.<br>• मा.अध्यक्षांनी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक | अहवाल अप्राप्त |
| 5 | **श्री. सुनील अगरवाल**<br>(**WC**- 92)<br>Mangroves and Wetlands destruction near Hiranandani Estate Thane. दि. 04.12.2021 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे | अहवाल अप्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | **श्री. सुनील अगरवाल.**<br>(**WC- 96**)<br>Violation of CRZ rules & Indian Wildlife Protection Act in Sector 60, Nerul Navi, Mumbai.<br>दि. 24.09.2022. | • सिडको यांच्या दि.30.11.2021 रोजीच्या अहवालानुसार या तक्रारीप्रमाणे NRI (नेरुळ) येथील वसाहती जवळील प्रस्तावित गोल्फ कोर्स जागेजवळील भूखंडाची तक्रारदारांच्या समवेत दि.11.11.2021 रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असून सिडको महामंडळाच्या विकास आराखडयाप्रमाणे सदरहू जागा गोल्फ कोर्स प्रकल्पासाठी प्रस्तावित आहे. त्या पॉकेट मधील D व E भागात कोणत्याही प्रकारचे काम चालू नाही व काही भागात पाणी साठलेले आहे. त्या पाण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भराव केलेला नाही तसेच सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **सदरची तक्रार ही सुप्रिम कोर्टात देखील चालू आहे.**<br>• समितीने या तक्रारीबाबत MCZMA तसेच विभागीय वन अधिकारी यांना उचित कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | 1. संचालक, पर्यावरण विभाग<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला | अहवाल अप्राप्त |
| 7 | **श्री. स्टॅलिन डी –**<br>**(WC- 102)** Blockage of tide water by CIDCO in Survey Number 265 Nerul.<br>**दि**. 08.10.2022. | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी ठाणे तसेच सिडको यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्याअनुषंगाने सिडको कार्यालयाच्या दि.17.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, सदर जागेवर काही स्थानिक मच्छीमार समाजातील लोकांनी लाकडी झडपे लावून समुद्राच्या पाण्याची भरती व आहोटी दरम्यान संचालन करत असल्याचे निदर्शनास आले. यात त्यांचा मच्छीमारांचा हेतू असल्याचे आढळून येत असून या ठिकाणी सिडको ने भू-विकासाचे कुठलेही कार्य हाती घेण्यात आलेले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• सोबत सहा. कार्यकारी अभियंता (वाशी), सिडको यांचा स्थळपाहणी अहवाल जोडण्यात आलेला आहे. | जिल्हाधिकारी, ठाणे | अहवाल अप्राप्त |
| 8 | **श्रीमती श्रुती अग्रवाल**<br>दि. 28.02.2023 **व**<br>**श्री. स्टॅलिन डी. दि**. 01.03.2023<br>**श्री. प्रदीप पाटोले दि**.16.05.2023<br>**(WC-105)**<br>1.Blockage of water in the wetlands behind NRI complex.<br>2.Survey No.22 a huge Mangrove patch is in possession of CIDCO. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | **श्री.निशांत बांगेरा –**<br>**(WC - 104)**<br>**दि.**11.02.2023<br>**श्री.स्टॅलिन डी.**<br>Reclamation of Railadevi Lake, Thane<br>**दि.**16.03.2023 | • ठाणे महानगरपालिका यांचे दि.15.05.2023 रोजीच्या अहवालानूसार रायलादेवी तलावात होत असलेल्या कामकाजाबाबतची विस्तृत माहिती दिली असून, सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिकेने गाळ काढण्याचे काम थांबविलेले असल्याचे नमूद केले आहे.<br>• सदर तलावामधील गाळ काढून संवर्धन करण्याबाबत वन विभाग, पर्यावरण तज्ञ, वन्यजीव तज्ञ यांचे समवेत दि.04.05.2023 रोजी बैठक घेतली असून, तलावाच्या पुर्नरुजीवनाबाबत तज्ञाच्या शिफारशी नुसार Restauration Plan तयार करण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे.<br>• मा.अध्यक्षांनी सदर अहवालाच्या अनुषंगाने संचालक, पर्यावरण विभाग व विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांनी तलावाच्या Restoration बाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. संचालक, पर्यावरण विभाग<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला | अहवाल अप्राप्त |

| **अ. क्र** | **तक्रार क्र. व तक्रारीचा विषय** | **करावयाची कार्यवाही** | **कार्यवाही करणारी यंत्रणा** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| | | **रायगड जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | | |
| 10 | **श्री.स्टॅलिन डी.**<br>(**WC**- 87)<br>Destruction of coastal Wetlands in Kharghar Sector 16.<br>दि. 05.01.2021 | • सिडको यांच्या दि.31.03.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर क्षेत्र पनवेल महानगरपालिकेत हस्तांतरीत केल्यामुळे याबाबत कार्यकारी अभियंता (प्रकल्प) पनवेल, पनवेल महानगरपालिका यांस सदर तक्रार वर्ग करण्यात आली आहे.<br>• तथापि सिडको अधिकाऱ्यांच्या दि.08.03.2023 रोजीच्या संयुक्त स्थळ पहाणी दरम्यान सदर जाळया श्री. मुझाम्मिल पटेल व इतर यांच्या असल्याचे समजले असून, दि.23.03.2023 रोजीच्या नियंत्रक, अनाधिकृत बांधकामे यांच्या अहवालानूसार सदर जागेवरील जाळया काढण्यात आलेल्या असून सोबत सदर जागेचे छायाचित्रे जोडण्यात आले असल्याचे नमूद केले आहे. | 1. व्यवस्थापकीय संचालक, सिडको | अहवाल प्राप्त |
| 11 | **श्री. स्टॅलिन डी** –<br>(**WC**- 100)<br>Wetlands already eliminated in defiance of court orders to protect and ones that are presently being destroyed.<br>दि. 12.07.2022. | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.02.11.2022 रोजीच्या अहवालानूसार **मौजे पाणजे**, ता.उरण, जि. रायगड येथील जागा वेटलँड नियम, 2010 नुसार वेटलॅडच्या यादीत समाविष्ट **नाही.** तसेच पाणथळ म्हणून अधिसूचित केलेली **नाही.**<br>• तसेच **मौजे भेंडखळ, मौजे बोकडविरा, मौजे सावरखार, मौजे जासई**, ता.उरण, जि.रायगड येथील जागा वेटलँड नियम, 2010 नुसार वेटलॅडच्या यादीत समाविष्ट **आहे**. परंतु पाणथळ म्हणून अधिसूचित केलेली **नाही.**<br>• त्याअनुषंगाने समितीच्या निर्देशानूसार उचित कार्यवाही करण्यात येईल. | 1. जिल्हाधिकारी रायगड | अहवाल प्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | **श्री. स्टॅलिन डी –**<br>(**WC**- 101)<br>Please Stop Reclamation and destruction of belpada Wetland. **दि**. 28.09.2022. | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी, रायगड | अहवाल अप्राप्त |
| 13 | **श्री. बी.एन.कुमार –**<br>**(WC - 103)**<br>10 acres of Kharghar wetland systematically buried<br>**दि** : 04.01.2023. | • सिडको यांच्या दि.24.05.2023 रोजीच्या स्थळपाहणी अहवालानूसार सदर भूखंडावर कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही तसेच रग्बी मैदानावर कुठलेही बांधकाम झालेले नसल्याचे नमूद केले आहे. सोबत स्थळपाहणी अहवालाचे छायाचित्रे जोडण्यात आलेली आहेत.<br>• जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.06.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीत नमूद मौजे खारघर सेक्टर 25 येथील प्लॉट रग्बी इंडिया यांना ग्राऊंडकरीता दिलेला आहे अशा आशयाचा बोर्ड जागेवर लावण्यात आला आहे. सदर जागेची स्थळपाहणी केली असता, सदर जागेवर कोणत्याही प्रकारचा भराव अगर बांधकाम केल्याचे दिसून आलेले नाही. तसेच जागेभोवती तारेचे कुंपन असून सदर जागेमध्ये तसेच जागेच्या भोवतालच्या परिसरात कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• सदर तक्रारीमध्ये नमूद मौजे तळोजे पाचनंद येथील स.नं.261, 262, 267, 268 व 270 चे कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासन सिडको असून सदरच्या जमीन मिळकती गाव नकाशानुसार तळोजे खाडी किनारी असल्यामुळे जमिनीच्या हद्दी मोजणी अंती स्पष्ट होतील. परंतु सदर क्षेत्राची आजरोजी पाहणी केली असता, तळोजेचे कार्यक्षेत्रामध्ये कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्षांच्या निर्देशानूसार सदर तक्रारी संदर्भात पुढील निर्णय घेण्यात येईल. | 1. जिल्हाधिकारी रायगड | अहवाल प्राप्त |
| 14 | **श्री.बी.एन.कुमार**<br>(**WC**-106)<br>NMSEZ IT Hub on Mangrove-wetland graves-Request to stop it.<br>दि : 08.03.2023 | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.30.05.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर जागेची दि.11.05.2023 रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, सदरची जागा सिडको संपादीत असून द्रोणागिरी डेव्हलपमेंट प्लॅनमधील सेक्टर 16 ते 28 या NMSEZ यांचे ताब्यातील जमीन आहे. सदर ठिकाणी आजरोजी कोणत्याही प्रकारचे IT संबंधित Hub चे काम सुरु नाही. त्यामुळे वेटलँड किंवा कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही.<br>• तसेच, सदरची जागा ही वेटलँड (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम, 2010 नुसार वेटलँड या यादीत समाविष्ट नाही. सबब, सदर जागेची तपासणी केली असता सदर जागेवर | 1. व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>2. विभागीय वन अधिकारी, मु.कां.सं.घ, कुर्ला. | अहवाल अप्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कांदळवन तोड झालेली नाही.<br>• मा.अध्यक्षांनी सिडको व विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | | |
| 15 | **श्री. बी.एन.कुमार**<br>**(WC-111)**<br>Reclamation of Dastan, Savarkhar intertidal waters complete.<br>दि. 23.04.2023 | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.14.07.2023 रोजीच्या अहवालानुसार 1) दास्तान फाटा शिव स्मारक ते करळ जंक्शन जुना पनवेल – उरण रस्ता 348A च्या पुर्व बाजुला जे.एन.पी.टी. यांचे नावे असलेल्या जमिनीमध्ये खाजगी विकासक खारपाटील, म्हात्रे व ठाकूर यांना 12.5 % योजनेकरीता भूखंड तयार करणेकामी दिलेला असून सदर विकासकांनी शिवस्मारक ते करळ जंक्शन पर्यंत अंदाजे 3.5 कि.मी. एवढया लांबीच्या जागेमध्ये अंदाजे 7 फुट उंच माती, दगड, मुरुम यांचा भराव केलेला आहे. 2) तसेच सावरखार येथील जे.एन.पी.टी. ब्रिजच्या पश्चिम बाजुला जे.एन.पी.टी. च्या नावे असलेल्या जमिनीमध्ये माती व डेब्रिजचा भराव केलेला असून सदर जागेमध्ये बांध घालून पाण्याची डबकी तयार केलेली आहेत. सदर जागेवर यापूर्वी भराव केलेला आहे.<br>• वर नमूद केलेल्या दोन्हीही जागा जे.एन.पी.टी. यांच्या मालकीच्या असून सदर जागेवर जे.एन.पी.टी. मार्फत विकास कामांकरीता वापर सुरु असल्याचे नमूद केले आहे. | जवाहरलाल नेहरु पोर्ट ॲथोरीटी, नवी मुंबई | अहवाल अप्राप्त |

| **पालघर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | | | | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| 16 | **श्री. दामोदर शिंगडा (WC-86)** वसई तालुक्यातील मौजे धोवली येथे पाणथळ क्षेत्रातील समुद्राला लागून असलेल्या सर्वे नं. १०९ ते सर्वे नं.११५ मधील ५० एकर पेक्षा जास्त पाणथळ जागेतील तिवरे / कांदळवन कापून बेकायदा भराव केल्याबाबत. दि. 26.12.2022. | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर, वसई–विरार महानगरपालिका तसेच उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. वसई-विरार, महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी पालघर<br>3. उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर | अहवाल अप्राप्त |
| 17 | **श्री. निलेश विनायक जोशी (WC- 95)**<br>पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील, वसई-विरार शहर | • सदर विषय पर्यावरण विभागाशी संबंधित असल्याने मा. अध्यक्षांनी सदर तक्रार पुढील कार्यवाहीसाठी संचालक, पर्यावरण विभाग यांचेकडे वर्ग करण्याचे निर्देश दिले. | 1. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई<br>2. वसई-विरार | अहवाल अप्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच येथील दिवाणमान परिसरातील CRZ Area - No Development Zone मधील बांधकाम अनधिकृत यादीत नसल्याबाबतची तक्रार.<br>दि. 21.12.2021 | | शहर महानगरपालिका<br>3. जिल्हाधिकारी पालघर | |
| 18 | **श्री.दिपक बारीया**<br>**(WC-107)**<br>तत्कालीन वसई तहसिलदार यांनी "पाणथळ तक्रार निवारण समिती" यांना सादर केलेले खोटे अहवाल व आरोपीत इसमासोबत स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी संगनमत करुन शासकीय कर्तव्य बजावण्यात केलेला कसूर ह्या बाबत.दि. 26.03.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर व उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी पालघर<br>2. उप वनसंरक्षक, पालघर | अहवाल अप्राप्त |
| 19 | **श्री.फ्रान्सिस डिसोजा**<br>**(WC-108)**<br>भुईगाव खुर्द व बुद्रुक हद्दीतील सरकारी मालकीच्या सर्व्हे नं.164 या पाणथळ खार जमिनीवर बेकायदा भराव व बेकायदा रस्त्याचे बांधकाम करीत असलेल्या गुन्हेगारांवर गुन्हा दाखल करुन कारवाई करणेबाबत.<br>दि. 31.03.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी पालघर व उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1.जिल्हाधिकारी पालघर<br>2. उप वनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर | अहवाल अप्राप्त |